**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR – 416 004 MAHARASHTRA**
Phone : EPABX-2609000 Stat Cell -0231-2609147.
Fax : 0091-231-2693294 website : www.unishivaji.ac.in
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर ४१६ ००४ – महाराष्ट्र**
दूरध्वनी: (ईपीएबीएक्स)२६०९००० सांख्यिकी कक्ष – ०२३१–२६०९१४७.
फॅक्स : ००९१–२३१–२६९३२९४. E-Mail : statcell@unishivaji.ac.in

**"A"Re-accredited by NAAC (2014) with CGPA- 3.16**

जा.क्र./शिवाजी. वि./सांख्यिकी कक्ष/**AISHE 2015-2016/** 156 दिनांक : 22 DEC 2015

प्रति,

मा. प्राचार्य / संचालक,

संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था.

विषय :— अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रम सन २०१५—१६
AISHE पोर्टलवर माहिती भरण्याबाबत.....

महोदय / महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविणेत येते की, सन २०१५—१६ या वर्षातील अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रमा अंतर्गत AISHE पोर्टलवर माहिती भरण्याबाबतचा उद्घाटन सोहळा दिनांक २१/१२/२०१५ रोजी नवी दिल्ली येथे मा. श्रीमती स्मृती इराणी, मंत्री, मानव संसाधन विकास मंत्रालय यांच्या हस्ते संपन्न झाला असुन सदरप्रमाणे आपल्या महाविद्यालयांची शैक्षणिक वर्ष २०१५—२०१६ ची माहिती AISHE पोर्टलवर दिनांक १५/०१/२०१६ पुर्वी नोंद करणे आवश्यक आहे.

पत्रा सोबत नोडल अधिकारी यांच्यासाठी जोडलेल्या सुचना आपण आपल्या महाविद्यालयातील AISHE नोडल अधिकारी यांच्या निर्देशनास आणुन त्याप्रमाणे त्यांच्याकडुन त्वरीत कार्यवाही करुन घ्यावी. ही विनंती

कळावे.

आपला विश्वासू,

संचालक,

सोबत : वरीलप्रमाणे

महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ

# महाविद्यालयातील **AISHE** नोडल अधिका–यांना सुचना

१) महाविद्यालयातील नोडल अधिका–यांनी सन २०१५–२०१६ या शैक्षणिक वर्षाची माहिती AISHE ( लिंक : http://aishe.nic.in/aishe/userlogin ) पोर्टलवरील DCF II मध्ये दिनांक १५/०१/२०१६ पर्यत भरणे आवश्यक आहे.

२) आपल्या महाविद्यालयांची AISHE पोर्टलवर भरलेली माहिती बिनचूक असावी यांची सर्व जबाबदारी महाविद्यालयांचे प्राचार्य व नोडल अधिकारी यांची राहील.

३) आपल्या महाविद्यालयांची AISHE व AICTE पोर्टलवर भरलेली माहिती Know Your College पोर्टलवर दिसणार असल्याने आपल्या महाविद्यालयांची माहिती अचूक असावी.

४) Know Your College पोर्टलवर AISHE व AICTE मध्ये भरलेली माहिती देशभर प्रकाशित केली जात असल्याने जगात कोणत्याही ठिकाणी KYC व्दारे आपल्या महाविद्यालयांची माहिती पाहता येणार आहे. याबाबत काळजी महाविद्यालयांच्या प्राचार्य व नोडल अधिकारी यांनी घ्यावी.

५) महाविद्यालयांच्या नोडल अधिका–यांनी दिलेल्या वेळेत AISHE पोर्टलवर माहिती नोंद केली नाही तर यु.जी.सी. नियमावलीनुसार महाविद्यालयांस मिळणा–या अनुदानापैकी २५ टक्के अनुदान कपात करण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

६) महाविद्यालयांच्या नोडल अधिका–यांनी दिलेल्या वेळेत AISHE पोर्टलवर माहिती नोंद केली नाही तर महाविद्यालयांचे रोस्टर तपासणी, परीक्षा फॉर्म व संलग्निकरणाचे कोणतेही काम विद्यापीठात केले जाणार नाही यांची कृपया नोंद घ्यावी.

७) AISHE पोर्टलवर माहिती नोंद करत असताना महाविद्यालयाच्या नोडल अधिका–यांना काही अडचण निर्माण झाल्यास आपण विद्यापीठामध्ये सांख्यिकी कक्ष, रुम नंबर ३१३, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे संपर्क साधावा अथवा दूरध्वनी क्रमांक ०२३१ २६०९१४७ येथे संपर्क करावा

८) महाविद्यालयाच्या नोडल अधिका–यांनी AISHE पोर्टलवर माहिती नोंदविल्यानंतर आपले Account ची माहिती पोर्टलवर **Remuneration Management** मध्ये अद्ययावत करावी. त्यामुळे पोर्टलवर माहिती भरलेल्या मोबादल आपल्याला तात्काळ मिळण्यास मदत होईल.

९) महाविद्यालयांच्या नोडल अधिका–यांनी आपल्या महाविद्यालयांची माहिती अचूक व वेळेत AISHE पोर्टलवर नोंद करुन विद्यापीठास सहकार्य करावे.

उपकुलसचिव
सांख्यिकी कक्ष,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.